असा. क्र. ४३ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**रविवार, ऑगस्ट १४, २००५/श्रावण २३, शके १९२७**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५.**—मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम .. .. .. पृष्ठे ४५६-४५९

दिनांक ९ ऑगस्ट २००५ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

**सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १४ ऑगस्ट २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** नृत्याविष्कार (dance performance) आयोजित करण्यासाठी, पोलीस आयुक्त, जिल्हा दंडाधिकारी आणि इतर विवक्षित अधिकारी यांनी नृत्याविष्कार लायसने प्रदान केली आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** ही नृत्याविष्कार लायसने प्रदान करण्यामागील उद्देश, सार्वजनिक मनोरंजनासाठी असे नृत्याविष्कार आयोजित करणे, हा आहे ;

**आणि ज्याअर्थी,** नृत्याविष्कार आयोजित करण्यासाठी ज्यांना लायसने देण्यात आली आहेत अशी खाद्यगृहे, परमीट रुम किंवा बिअर बार हे, असभ्य, अश्लील आणि हीन पद्धतीने नृत्याविष्कार करू देत असल्याचे राज्य शासनाच्या निदर्शनास आणण्यात आले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** असे नृत्याविष्कार महिलांच्या शोषणास कारणीभूत ठरत असल्याचेही शासनाच्या निदर्शनास आणण्यात आले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** असे नृत्याविष्कार ज्या पद्धतीने आयोजित केले जात आहेत त्या पद्धतीविषयी अनेक तक्रारी शासनाला प्राप्त झाल्या आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** खाद्यगृहे, परमीट रुम किंवा बिअर बार यांमध्ये असे नृत्याविष्कार करणे हे महिलांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणणारे असून, त्यामुळे सार्वजनिक नीतिमत्ता अथवा नीतिमूल्ये भ्रष्ट होण्याचा, त्यांचा भंग होण्याचा किंवा त्यांना हानी पोहोचण्याचा संभव आहे असे शासनास वाटते ;

**आणि ज्याअर्थी,** खाद्यगृहांतील, परमीट रुममधील किंवा बिअर बारमधील नृत्याविष्कारांच्या अशा आयोजनांवर बंदी घालणे शासनास इष्ट वाटते ;

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त प्रयोजनांसाठी, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— १९५१ चा मुंबई २२.

संक्षिप्त नाव. १. या अधिनियमास मुंबई पोलीस (सुधारणा) अधिनियम, २००५ असे म्हणावे.

सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२ यामध्ये कलमे ३३क आणि ३३ख समाविष्ट करणे. २. मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ याच्या कलम ३३ नंतर पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :— १९५१ चा मुंबई २२.

खाद्यगृह, परमीट रुम किंवा बिअर बार यांमधील नृत्याविष्कारावर बंदी आणि इतर परिणामरूप तरतुदी. " **३३क.** (१) या अधिनियमामध्ये, किंवा, पोलीस आयुक्ताने किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याने आपापल्या प्रभारांखालील क्षेत्रांकरिता कलम ३३ च्या पोट-कलम (१) अन्वये केलेल्या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, मुंबई पोलीस (सुधारणा) अधिनियम, २००५ याच्या प्रारंभाच्या दिनांकास आणि तेव्हापासून,— २००५ चा महा. ३५.

(क) खाद्यगृहामध्ये, परमीट रुममध्ये किंवा बिअर बारमध्ये कोणत्याही तऱ्हेचा किंवा प्रकारचा (of any kind or type) नृत्याविष्कार आयोजित करण्यावर बंदी घालण्यात आली आहे ;

(ख) खाद्यगृहामध्ये, परमीट रुममध्ये किंवा बिअर बारमध्ये कोणत्याही तऱ्हेचा किंवा प्रकारचा नृत्याविष्कार आयोजित करण्यासाठी लायसन प्राधिकारी असलेल्या पोलीस आयुक्ताने, जिल्हा दंडाधिकाऱ्याने किंवा यथास्थिति, इतर कोणत्याही अधिकाऱ्याने, उपरोक्त नियमांन्वये दिलेली सर्व नृत्याविष्कार लायसने रद्द ठरतील.

(२) कलम १३१ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (१) चे उल्लंघन करून, खाद्यगृहामध्ये, परमीट रुममध्ये किंवा बिअर बारमध्ये कोणत्याही तऱ्हेचा किंवा प्रकारचा नृत्याविष्कार आयोजित करणाऱ्या किंवा आयोजित करण्याची व्यवस्था करणाऱ्या किंवा आयोजित करण्यास परवानगी देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, दोषसिद्धीनंतर, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची आणि दोन लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल :

परंतु, न्यायालयाच्या न्यायनिर्णयात नमूद करण्यात येतील अशी, त्याविरुद्ध विशेष व पुरेशी कारणे नसतील तर, अशी कारावासाची शिक्षा तीन महिन्यांहून कमी असणार नाही आणि दंड पन्नास हजार रुपयांहून कमी असणार नाही.

(३) पोट-कलम (१) अन्वये जिचे नृत्याविष्कार लायसन रद्द करण्यात आले आहे अशी कोणतीही व्यक्ती, तिच्या खाद्यगृहात, परमीट रुममध्ये किंवा बिअर बारमध्ये कोणत्याही तऱ्हेचा किंवा प्रकारचा नृत्याविष्कार आयोजित करीत आहे किंवा आयोजित करण्याची व्यवस्था करीत आहे किंवा आयोजित करण्यास परवानगी देत आहे असे, लायसन प्राधिकाऱ्याच्या निदर्शनास आले तर, लायसन प्राधिकारी, कलम ३३ अन्वये तयार केलेल्या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, खाद्यगृह म्हणून दिलेले नोंदणी प्रमाणपत्र आणि परमीट रुम किंवा बिअर बारला सार्वजनिक करमणुकीची जागा ठेवण्यासाठी दिलेले लायसन (PPEL) निलंबित करील आणि लायसनधारकाला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, ते नोंदणी प्रमाणपत्र आणि लायसन निलंबित केल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या कालावधीत एकतर, नोंदणी प्रमाणपत्र आणि लायसन निलंबित करण्याबाबतचा आदेश मागे घेईल किंवा नोंदणी प्रमाणपत्र आणि लायसन रद्द करील.

(४) पोट-कलम (३) अन्वये, नोंदणी प्रमाणपत्र आणि लायसन रद्द करणाऱ्या, लायसन प्राधिकाऱ्याच्या आदेशाने व्यथित झालेल्या व्यक्तीस, आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या कालावधीत राज्य शासनाकडे अपील करता येईल. राज्य शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

(५) पोट-कलम (१) अन्वये जिचे नृत्याविष्कार लायसन रद्द झाले असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, असे लायसन ज्याने दिले असेल अशा लायसन प्राधिकाऱ्याकडे, योग्य प्रमाणात लायसन फी परत मिळण्यासाठी अर्ज करता येईल. असा लायसन प्राधिकारी, योग्य ती चौकशी केल्यानंतर, असा अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या कालावधीत, यथाप्रमाण तत्त्वानुसार लायसन फी परत करील.

(६) या कलमाखाली शिक्षापात्र असलेला अपराध हा, दखलपात्र व अजामीनपात्र असेल.

विवक्षित प्रकरणांमध्ये कलम ३३क च्या तरतुदी लागू नसणे.

**३३ख.** या अधिनियमाच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या अन्य तरतुदींना अधीन राहून, नाट्यगृह, सिनेमागृह, श्रोतृगृह ; अथवा जेथे फक्त त्याच्या सदस्यांनाच प्रवेश आहे अशा खेळाच्या क्लबमध्ये किंवा जिमखान्यामध्ये ; किंवा त्रितारांकित किंवा त्याच्या वरच्या दर्जाच्या हॉटेलमध्ये होणाऱ्या, अथवा (अ) राज्यातील पर्यटनविषयक उपक्रमांना चालना मिळावी म्हणून केंद्र वा राज्य शासन राबवीत असलेले पर्यटन धोरण किंवा (ब) सांस्कृतिक उपक्रम विचारात घेऊन, राज्य शासन यासंदर्भात विशेष वा सर्वसाधारण आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अन्य कोणत्याही आस्थापनेमध्ये किंवा आस्थापनांच्या वर्गामध्ये होणाऱ्या, नृत्याविष्काराच्या आयोजनास, कलम ३३क मधील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनासाठी, " खेळाचा क्लब " किंवा " जिमखाना " याचा अर्थ, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० किंवा सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० किंवा कंपनी अधिनियम, १९५६ किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा यांच्या तरतुदींन्वये, खेळाचा क्लब किंवा जिमखाना म्हणून नोंदणी करण्यात आलेली आस्थापना, असा आहे. ".

१९५० चा मुंबई २९. १८६० चा २१. १९५६ चा १.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई